# Topic - 3. Social Institution सामाजिक संस्था

## B. Importance of Social Institution :

**सामजिक संस्थांचे महत्व :**

- **प्रस्तावना :**

सामाजिक संस्था या समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडत असतात.व्यक्ती आणि समाज या दोघांच्या आवश्यक गरजांची पूर्तता सामाजिक संस्थाच्या माध्यमातून केली जात असते.याचाच अर्थ काही विशिष्ट गरजांच्या पुर्ततेसाठी सामाजिक संस्था निर्माण होत असल्या तरी सर्वसाधारणपणे सामाजिक सामजिक संस्थांचे कार्ये किंवा महत्व पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. सामजिक व्यवहारात सुलभता निर्माण करणे-**

सामाजिक जीवनात तसेच वेगवेगळया प्रसंगामध्ये विविध दर्जांवरील व्यक्तींनी कसे वागावे याची निश्चिती सामाजिक संस्थाच्या माध्यमातून होत असते. प्रत्येक व्यक्तीला आपले हक्क व कर्तव्ये कोणती आहेत, या संदर्भात आवश्यक असणारे मार्गदर्शन हे देखील सामाजिक संस्थाच्या माध्यमातून होत असते.त्यामुळे लोकांना प्रत्यक्षात गोंधळाच्या परस्थितीला सामोरे जावे लागत नाही.याचाच अर्थ सामाजिक संस्थांमुळे सामाजिक व्यवहारात सुलभता निर्माण होते.

**२. मानवी वर्तनावर / व्यवहारावर नियंत्रण –**

सामाजिक संस्था मानवी व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचे महत्वाचे कार्य करतात. कारण मानवाने आपल्या आवश्यक गरजांची पूर्तता सामाजिक संस्थांनी ठरवून दिलेल्या मार्गानेच करावी लागते.समाजमान्य नसलेल्या मार्गाने गरजांची पूर्तता करण्याची मान्यता संस्था कोणालाही देत नाही.याचाच अर्थ सामाजिक संस्था या मानवाच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य करत असतात.

**३. दर्जा व भूमिका प्रदान करणे –**

सामाजिक संस्थेद्वारे प्रत्येक व्यक्तीला समाजात स्थान म्हणजेच दर्जा प्राप्त होत असतो.आणि या स्थानाला किंवा दर्जाशी संबंधित कार्य करावे लागत असते. याचाच अर्थ प्रत्येक व्यक्तीला दर्जा प्रदान करून त्याच्याशी सुसंगत भूमिका पार पाडण्यासाठी तयार करण्याचे महत्वाचे काम सामाजिक संस्था करत असतात.

**४. समाजाचे स्थैर्य व सातत्य टिकवून ठेवणे –**

सामाजिक संस्था या व्यक्ती व समाजाच्या मुलभूत गरजांची पूर्तता करत असतात. या गरजांची पूर्तता करत असताना व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य देखील पार पाडत असतात.परिणामी समाजात अव्यवस्था किंवा गोंधळ निर्माण होत नाही.समाजाला संघटीत स्वरूप प्राप्त होते.समाजाला एक स्थिर व्यवस्था प्राप्त होते.ही सामाजिक व्यवस्था टिकवून ठेवण्यामध्ये सामाजीक संस्था अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावतात.परिणामी सामजिक संस्था या मानवी समाजचे अस्तित्व टिकवून ठेवण्यामध्ये महत्वाची भूमिका पार पाडतात.

**५. सामाजिक संस्था सामाजिक परिवर्तनाचे कारण बनू शकतात –**

सामाजिक संस्था या समाजातील प्रथा व परंपरा यामधूनच निर्माण होत असतात.त्यामुळे शक्यतो संस्था या प्रथा व परंपरा याला चिकटून असतात.बदलत्या परस्थितीत आवश्यक त्या गोष्टींची पूर्तता करणे संस्थेला शक्य होत नाही.अशावेळी सामाजिक संस्थामध्येच बदल करण्याचा प्रयत्न केला जातो.या बदलांमुळे सामाजिक परिवर्तने घडून येतात.

**६. व्यक्तिमत्व विकासास सहाय्यक –**

सामाजिक संस्थांचा व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर फार मोठा प्रभाव पडत असतो.सामाजिक संस्थांच्या प्रमानकांनुसार वर्तन करण्याचा प्रयत्न व्यक्ती करत असते.करण त्याशिवाय व्यक्तीच्या आवश्यक गरजांची पुर्तता करणे शक्य नसते. सामाजिक संस्थेमधील आपली असणरी भूमिका व्यक्ती योग्यप्रकारे पार पडण्याचा प्रयत्न करत असते.त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा विकास घडून येतो.

**७. संस्था या संस्कृतीच्या वाहक असतात –**

मानवी समाजातील सामाजिक संस्थांच्या माध्यमातून त्या समाजातील संस्कृतीचे हस्तांतरण होत असते.समाजातील सदस्यांना संस्कृतीची ओळख ही सामाजिक संस्थांच्या माध्यमातून होत असते. आपल्या समाजातील अनेक गोष्टीं,प्रथा,परंपरा याबद्दल ज्ञान,ओळख,माहिती ही सदस्यांना देण्याचे महत्वाचे काम सामाजिक संस्था करत असतात.पर्यायी सांस्कृतिचे हस्तांतरण त्यामुळे होत असते. यामुळेच सामाजिक संस्था या संस्कृतीचे वाहक म्हणून काम करत असतात.

**सारांश –**

सामाजिक संस्था वरीलप्रमाणे व्यक्ती व समाज या दोघांसाठी लाभदायक ठरत असल्याचे निदर्शनास येते.त्यामुळेच सामाजिक संस्थाना मानवी समाजात विशेष स्थान,महत्व प्राप्त झालेले आहे.